# प्रकरण पहिले

साहित्याच्या इतिहासातील क्रांतिपर्व

दलित साहित्य म्हणजे काय ?

दलितेतरांनी केलेले दलितां विषयींचे लेखन

दलित साहित्याचे स्वरूप

संदर्भ, टीपा इ.

प्रकरण पहिले

# साहित्याच्या इतिहासातील क्रांतिपर्व .

मराठी साहित्याच्या प्रवादात दलित साहित्याची दखल घेतली पाहिजे अशी परिस्थिती आज निर्माण झाली आहे. दलित साहित्य वयाने तसे मोठे नाही. वीस पंचवीस वर्षांचा इतिहास त्याच्या पाठीशी आहे. या एवढ्याकालावधीत दलित साहित्याने आपल्या वेगळेपणाची झलक दाखविली आहे. दलित जाणिवेतून निर्माण झालेले हे लेखन साहित्य क्षेत्राला नवे वळण लावीत आहे.। दलित साहित्याच्या निर्मितीने मराठी समाजाच्या आणि साहित्याच्या इतिहासात क्रांती झाली असून मराठी साहित्यातील लेखन विषयाचे आणि अनुभव विश्वाचे क्षेत्र विस्तारत असल्याचा निर्वाळा अनेक समीक्षकांनी दिला आहे. एक गोष्ट मात्र गेल्या वीस-पंचवीस वर्षात प्रामुख्याने नजरेस आली आणि वाङ्मयाच्या दृष्टीने तिला अभूतपूर्व महत्व आहे, ती म्हणजे नवा लेखक वर्ग उदयाला येऊ लागला आहे. तो थर आतापर्यन्त मुका होता. आज त्याची अस्मिता जागृत झाली आहे. तो बोलू लागला आहे. तो जी आज निर्मिती करत आहे, त्यातून किती तरी नव्या जाणीवा,नव्या प्रवृत्ती प्रकट होत आहेत. हा असंघटित असणारा नवावर्ग संघटित होऊ पहात आहे. आपल्या वेगळ्या साहित्य संस्था, आपली वेगळी वाङ्मयीन नियतकालिके, आपली वेगळी साहित्य संमेलने तो आता निर्माण करू पहात आहे. या लेखक वर्गाच्या वाङ्मय निर्मितीमुळे आणि वाङ्मयीन चळवळीमुळे मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात प्रथमत:च कांहीतरी अपूर्व घडू पहात आहे.

या नव्या साहित्यिकांनी आणि त्यांच्या साहित्याने गेल्या कांही वर्षात वादळे उठवली आहेत. या दलित साहित्याच्या संदर्भात नियतकालिकातून, व्यासपीठावरून अनुकूल प्रतिकूल मतांचे वारे वाहात आहेत. दलित साहित्याला, सुरूवातीला होणारा कडवा विरोध आता मावळला आहे. अनिच्छेने कां होईना दलित साहित्याच्या स्वागतासाठी पुढे सरकावे अशी काहीशी अवस्था आज दलित साहित्याच्या बाबतीत कित्येकांची झाली आहे.कारण विरोधकांचीही

LIBRARY KOLHAPUR

क्षिती न बाळगता ते नव्या जोमाने पुढे येऊ लागले आहे. पण दलित साहित्याकडे व त्यांतून व्यक्त होणाऱ्या विचारभावनांकडे अद्यापि निराग्रही, मुक्त दृष्टीने पाहण्याची वृत्ती आलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. या साहित्याचे व साहित्यिकांचे कृत्रिम स्वागत करण्यापेक्षा त्यांच्या भूमिकेचे यथातथ्य आकलन करून घेण्याची अधिक आवश्यकता आहे. म्हणूनच निर्मलकुमार फडकुले म्हणतात की [१], " दलित साहित्याकडे दलितेतर वाचक आणि समीक्षक प्रांजलपणे पाहू शकले तर साहित्याचे कांही स्वतंत्र इतराहून सर्वस्वी निराळे असे अनुभव विश्व आहे काय व ते कलारूप घेऊ शकते काय याची त्यांना चिकित्सा करता येईल."

## दलित साहित्य म्हणजे काय ?

" दलित साहित्य " या शब्दाविषयी आतापर्यन्त बरीच चर्चा झाली आहे. कधी या शब्दातील दलित या संज्ञेला व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला आहे तर कधी त्याचा संकोच तो जातीवाचक मानण्यात आला आहे. आपण येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, दलित हा शब्द वर्गवाचक नाही. दलित म्हणजे एक विशिष्ट सामाजिक स्थिती अनुभवीत असलेला मानव समूह किंवा समाजगट. भारतातील समाज व्यवस्थेत या शब्दाला विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे. अर्थात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक असा निरनिराळा आशय त्यात समाविष्ट आहे.

कांही विचारवंत, साहित्यिक व लेखक यांनी " दलित " या शब्दाची व्याख्या व व्याप्ती वेगवेगळ्या दृष्टिकोनातून व वेगवेगळ्या अंगाने केलेली आहे. कुणी " दलित " याचा अर्थ व्यापक घेतलेला आहे , तर कुणी संकुचित केलेला आहे. अशा प्रकारे दलित साहित्याची व्याख्या, दलित म्हणजे कोण, दलित साहित्याच्या मर्यादा इत्यादी अनेक प्रश्नांचा खल झालेला दिसतो.

कांही साहित्यिकांनी " दलित " या शब्दाचा अर्थ आर्थिक दृष्टिकोणातून मांडलेला आहे. आपल्या आर्थिक दृष्टिकोनाचे स्पष्टीकरण करताना डॉ. म.ना.वानखेडे सांगतात की, दलित या शब्दाची व्याख्या केवळ बौध्द अथवा मागासवर्गीयच नव्हे तर जे जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत ते सर्व दलित या व्याख्येत समाविष्ट होतात. यावरून आर्थिकदृष्टया व सामाजिकदृष्टया मिळून एक सर्व समावेशक दलितवर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतमजूर, उपजीविकेसाठी श्रमणारे आणि अस्पृश्यही येतील. ज्याची पिळवणूक होते ते दलित. आर्थिक दृष्टिकोनातून ज्यांनी " दलित कोण " याबाबतचे विवेचन केले त्यांची ही दृष्टी वर्गवादी दिसते. पिळणारे आणि पिळले गेलेले असे दोन वर्ग त्यात दिसतात.

"दलित " व " दलित साहित्य " या शब्दप्रयोगांची व्याख्या अनेकांनी आर्थिक दृष्टिकोनातून सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. - त्यामुळे " दलित " व " दलित साहित्य " यांचा अर्थ व्यापक झालेला आहे. त्यातून त्यांची वर्गवादी (Class-system) दृष्टी स्पष्ट झालेली आहे. ते दलितांकडे वर्गीय दृष्टीने पाहतात. आधुनिक शहरीकरणात औद्योगिक क्रांतीमुळे जे वर्ग निर्माण होतात अशा त्या वर्गपध्दतीचा या साहित्यिक व समीक्षकांच्या विचारावर प्रभाव पडला आहे. त्यातच वर्गवादाची दीक्षा घेतलेल्या लेखकांवर,समीक्षकांवर मार्क्सच्या वर्गवादी विचारांची दाट छाया पडल्यासारखी दिसते. विशेषात: डॉ. म.ना.वानखेडे, श्री.बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, डॉ.सदा क-हाडे, वि.वा.शिरवाडकर, श्री.वसंत पळशीकर,दया पवार या साहित्यिकांनी व समीक्षकांनी केलेल्या " दलित " व " दलित साहित्या"च्या व्याख्येला आर्थिक दृष्टिकोनाचा आणि वर्गीय दृष्टीचा पाया असल्याचे दिसते.

जे पिडलेले, नाडलेले, वर्णभेदामुळे ज्यांच्यावर अन्याय झाला आहे अथवा आर्थिकदृष्टया मागासलेले या सर्वांना दलित म्हणून समजण्यास प्रा.केशव मेश्राम यांनी कडाडून विरोध केला आहे, ते म्हणतात[९] " हजारो वर्षे ज्यांच्यावर

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

अन्याय झाला अशा अस्पृश्यांना दलित म्हटले पाहिजे व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास दलित साहित्य म्हणावे " दलितांनी दलितांसाठी लिहिलेल्या साहित्यास दलित साहित्य म्हणावे, असा मेश्राम यांचा आग्रह आहे -- प्रा.मेश्राम यांची या मागील दृष्टी सामाजिक व सांस्कृतिक जाणिवेची आहे. प्रा.प्रभाकर मांडे यानी या सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीचे स्पष्टीकरण करतांना म्हटले आहे की, दलित म्हणजे अशा व्यक्तींचा समूह, ज्यांचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरावून गेला आहे. ज्याच्या - जन्माने ज्याच्या वाट्याला या समाज रचनेत एकाच प्रकारचे जीवन आले आहे . माणूस म्हणून ज्यांचे मूल्य अव्हेरले गेले आहे, ज्यांना माणसासारखे मानाने जगणे नाकारले गेले आहे. ते दलित. प्रा. मेश्राम व डॉ. प्रभाकर मांडे यांची दृष्टी सामाजिक व सांस्कृतिक जाणिवेची आहे. त्यांनी समाजपध्दतीतील प्रत्यक्षातील जातीय पध्दती ( Caste-system ) पाहूनच ही दृष्टी घेतली. वर्ग पध्दतीचा ( Class-system ) प्राप्तव्यवस्थेत ते स्वीकार करत नाहीत. याशिवाय " दलित" व " दलित साहित्य " यांची व्याख्या व व्याप्ती याकडे सामाजिक व सांस्कृतिक जाणिवेच्या दृष्टिकोनातून पाहणारे, दलितत्वाच्या जाणिवेतून पाहणारेही साहित्यिक व समीक्षक आहेत. त्यात प्रामुख्याने प्रा. गंगाधर पानतावणे, प्रा.म.भि.चिटणीस, राजा ढाले, प्रा.रा.भि.जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे साहित्यिक समीक्षक आहेत.

बाबुराव बागूल यांनी " दलित साहित्य माणसाला केंद्रबिंदू मानते. माणसाच्या सुखदु:खांशी समरस होते व माणसाला सम्यक क्रांतिकडे घेऊन जाते" असे सांगून पुढे म्हटले आहे,[३] " दलित हे जागतिक दुखणे आहे, माझे लिहिणे हे माणसाचे चरित्र-चित्रण असते. कोणत्याही एका विशिष्ट जातीजमातीचे नाही. आणि तरी ते दलितच आहे. हिंदुसंस्कृती,पौराणिकता यांच्यापासून जे वेगळे आहे, ते दलित साहित्य असे मी मानतो. म्हणूनच दलित साहित्यिकाने दलितासाठी लिहिलेलं वाङ्मय तेच " दलित-साहित्य " असे मी मानत नाही.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

म्हणूनच सा-या परंपरा नाकारून मी " माणूस " केंद्रवर्ती मानतो. या माणसाला वर्ण, वर्ग, जात नसते. माझी इच्छा असेल तर मी ब्राह्मण, हिंदू, ज्यू कोणाचेही चित्रण करीन." या बाबुराव बागुलांच्या भूमिकेसारखीच भूमिका डॉ. म.ना.वानखेडे मांडतात, ते म्हणतात[४] " " दलित या शब्दाची व्याख्या केवळ बौध्द अथवा मागासवर्गीय नव्हे तर जे जे पिळले गेलेले श्रमजीवी आहेत ते सर्व दलित या व्याख्येत समाविष्ट होतात." डॉ.सदा क-हाडे यांनी याच त-हेची आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले आहे[५], " आर्थिक दृष्टया व सामाजिक दृष्टया मिळून एक सर्व समावेशक दलितवर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतकरी, उपजीविकेसाठी श्रमणारे आणि अस्पृश्यही येतील. ज्यांची पिळवणूक होते ते दलित". --- बाबुराव बागूल, डॉ.म.ना.वानखेडे व डॉ. सदा क-हाडे इ.च्या हा "दलित" व " दलित साहित्या"च्या व्याख्या सर्व समावेशक आहेत. " दलित" शब्दाचा अर्थ व व्याप्ती अधिक व्यापक करणा-या आहेत. तर " दलित म्हणजे अशा व्यक्तींचा समूह, ज्यांचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरावला गेला आहे. ज्यांच्या जन्माने ज्यांच्या वाट्याला या समाज रचनेत एकाच प्रकारचे जीवन आले. माणूस म्हणून ज्यांचे मूल्य अव्हेरले गेले आहे. ज्यांना माणसासारखे मानाने जगणे नाकारले गेले आहे "[६] अशा " दलित लेखकांनी, दलिताविषयी, दलितांसाठी लिहिलेले साहित्य."[७] या प्रभाकर मांडे आणि प्रा. केशव मेश्राम यांच्या व्याख्या " दलित" आणि " दलित साहित्य " यांचा अर्थ व व्याप्ती संकुचित करणा-या आहेत -- दलित व दलित साहित्य विषयक झालेल्या या चर्चेतून दोन प्रकारचे सूर दिसतात ते म्हणजे जन्माने दलित वर्गीय असणा-या लेखकाने दलित समाजाविषयी लिहिलेले ते दलित साहित्य हा एक सूर आणि जो जो शोषित,तो तो दलित, म्हणून त्याच्या विषयी कोणीही लिहिलेले ते दलित साहित्य, हा दुसरा सूर दिसतो. डॉ. भालचंद्र फडके या दुस-या सुराबाबत भाष्य करताना म्हणतात की[८] " मग " दलित साहित्याची चळवळ " या शब्द प्रयोगा ऐवजी " शोषितांच्या साहित्याची चळवळ " असा शब्दप्रयोग योजावा लागेल. सर्व बाजूनी पिळला जाणारा पांढरपेशा ब्राह्मण

वर्गही पिळवणूक होते म्हणून दलितांत समाविष्ट करावा लागेल. केवळ पिळवणूक होते म्हणून त्याला दलित म्हणता येणार नाही. ज्याची पिळवणूक विशिष्ट जातीत जन्माला आल्यामुळे होते तो दलित. " तेव्हा " दलित " शब्दाची व्याख्या सर्व समावेशक करणे फारसे योग्य ठरणार नाही.

राजा ढाले यांनी आपली भूमिका स्पष्ट व तर्कशुध्द रीतीने मांडली आहे.[१] त्यांना वाटते की," दलित शब्दाची व्याख्या केवळ बौध्द अथवा मागासवर्गीय नव्हे तर जे जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत ते सर्व दलित आहेत असे मानण्यामुळे अन्याय होतो. असे म्हणण्याने अन्याय करणारे आणि अन्यायाला बळी ठरणारे यांना एकत्र बांधण्यात येते. ही विळ्याभोपळ्याची मोट आहे " -- आज " दलित" या शब्दाची व्याख्या बदलली जात आहे आणि दलित म्हणजे अस्पृश्य या अर्थाला नष्ट करून अस्पृश्यतेला गौणत्व देण्यात येत आहे. अस्पृश्यतेला गौणत्व देऊन ती नष्ट होणार नाही. वस्तुस्थितीचा विपर्यास म्हणजे तिची ही व्याख्या आहे. तेव्हा " दलित " व " दलित साहित्य " या शब्दाचा अर्थ व्यापक करण्याचा हा प्रयत्न, ही घडपड उचित नव्हे. त्या साहित्यिक,समीक्षकांच्या विचारात वर्गवादी दृष्टी आहे. ते "दलिता"कडे वर्गीय दृष्टीने पाहतात.आधुनिक शहरीकरणाला - औद्योगिक क्रांतीमुळे जे वर्ग निर्माण होतात अशा या वर्गपध्दतीची या साहित्यिक व विचारवंतावर प्रभाव पडला आहे.त्यातच वर्गवादाची दीक्षा घेतलेल्या लेखकांच्यावर मार्क्सच्या वर्गवादी विचाराची दाट छाया पडल्यासारखी दिसते.डॉ. सदा कऱ्हाडे दलित साहित्याला पुरोगामी साहित्याजवळ नेतात आणि पुरोगामी साहित्य हे - मार्क्सवादी असू शकते असे म्हणतात. दया पवारांची मीमांसा ही याच प्रकारची आहे. या मार्क्सवादी - वर्गवादी विचाराच्या दाट छायेमुळे " दलित" व " दलित साहित्य " याकडे सामाजिक - सांस्कृतिक जाणिवेतून पाहण्याची त्यांची दृष्टी कमी होते, वर्गीय दृष्टीने पाहण्याचा त्यांच्यावर प्रभाव पडतो. शेवटी ते मार्क्सवादी वर्गीय दृष्टीकडे वळलेले दिसतात.(वास्तविक भारतीय समाज

पध्दतीतील जातीय पध्दतीच्या ( Caste system ) मूलभूत गुणधर्मांकडे या मंडळींनी दुर्लक्ष केलेले दिसते. भारतीय समाज पध्दतीत जातीय पध्दती आहे. तिच्या जागी ही मंडळी पाश्चिमात्य देशातील वर्ग पध्दती ( Class-system ) आणू पाहतात. हे तात्विक दृष्टयाही चुकीचे आहे. वास्तविक भारतीय समाज पध्दतीत जातीय पध्दती खोलवर स्थानात व मनात पक्की बसलेली आहे. शहरातील कामगार हा खऱ्या अर्थाने कामगार झालेला नाही. तो कारखान्यात, फॅक्टरीत, गिरणीत काम करताना कामगार म्हणून काम करतो पण तो जेव्हा आपल्या वस्तीत, वाड्यात घरी जातो तेव्हा तो जातवाला बनतो. मुंबईचा कामगार जेव्हा आपल्या खेडेगावी जातो, तेव्हाही तो जातवाला म्हणूनच जातो.

ग्रामीण भागात खेडेगांवी स्पृश्यभूमिहीन मजूर, दलित-अस्पृश्य-भूमिहीन मजूरावर अस्पृश्यतेच्या भावनेतून जातीयतेच्या उच्चनीच भावनेतून अन्याय, अत्याचार करतात. त्याचा छळ करतात. खेडेगांवी स्पृश्य भूमिहीन मजूरात आजही वर्गीय दृष्टी आलेली नाही. तो आपल्या जातीच्या किल्ल्यातच राहतो. अस्पृश्यता मानतो आणि अस्पृश्यतेच्या भावनेतून तो अस्पृश्यांचा छळही करतो. ही वास्तव परिस्थिती पाहता, येथे आर्थिक दृष्टिकोनातून-वर्गवादी दृष्टीने पाहता येणार नाही. येथे सामाजिक जाणिवेतून, सामाजिक - सांस्कृतिक दृष्टिकोनातूनच पाहावे लागेल.

श्री राजा ढाले याबाबत, सडेतोडपणे म्हणतात की,[10] " आज आमचं साहित्य " दलित साहित्य " म्हणून ओळखलं जात आहे. काही लोक दलित या शब्दातून ध्वनित होणारी आपली अस्पृश्यता सोईस्करपणे विसरुन त्यातील आर्थिक मागासलेपणाचे आपले दु:ख मांडत आहेत. अस्पृश्यतेचा असा सोईस्कर आपणालाच विसर पडणे याहून अस्पृश्यता नष्ट होण्याचा सोपा मार्ग कोणता असू शकतो ? जे असं स्वत:ला विसरता येते व दुसऱ्याचं दु:ख स्वत:चं म्हणून उरावर लादतात त्यांना स्वत:ची आयडेंटिटी नसली आहे असे कोण म्हणेल ? ते अद्यापही स्वत:ला अनोळखीच राहिले आहेत. म्हणूनच त्यांना अस्पृश्यता

परवडते पण आर्थिक कोंडी परवडत नाही. पण दलितांच्या आर्थिक कोंडीचं मूळही अस्पृश्यतेने केलेल्या आमच्या कोंडीतच आहे, हे त्यांना कसे कळणार ?"

या सर्वाचा अर्थ इतकाच की, " दलित " या शब्दाचे स्वरूप बदलून दलित साहित्याचे मूळ स्वरूप बदलणार नाही. दलित साहित्याच्या नव्या प्रवाहावर झालेले हल्ले परतवू न शकल्यामुळे माघार घेऊन वस्तुस्थितीकडे पाठ फिरवून दलित साहित्याची व्याख्या केली जात आहे. दलित साहित्याची व्याख्या वस्तुस्थितीला महत्व देणारी असली पाहिजे. अकारण व्यापकता वाढविण्याचा हव्यास धरून " दलित" व " दलित साहित्या"च्या केलेल्या व्याख्या वस्तुस्थिती नाकारणाऱ्या आहेत. जन्मप्राप्त दलितत्व ही कसोटीच याबाबत अंतिम कसोटी नाही पण जन्मप्राप्त दलितत्व ही कसोटीच याबाबत मान्यता पावलेली दिसते. पण सर्वच दलितांनी लिहिलेले सर्वच साहित्य दलित साहित्य म्हणून मान्य पावलेले नाही. ग्रेस याचे साहित्य त्याला उदाहरण म्हणून सांगता येईल. याचा अर्थ जन्मप्राप्त दलितत्व एवढीच दलित साहित्याची कसोटी नसून, त्याच्या जोडीने दलित संवेदनाची अभिव्यक्ती, त्यांच्या अनुभवांचे निराळेपण ही एक बाब अपेक्षित आहे. एखादी व्यक्ती दलित या समाज गटात जन्माला आली म्हणून त्याचे साहित्य दलित होत नाही, त्याच प्रमाणे त्याने दलित या समाज गटाशी संबंधित विषय घेतले म्हणूनही ते दलित साहित्य समजले जात नाही किंवा विशिष्ट भूमिका त्यातून घेतलेली असली, म्हणूनही ते दलित साहित्य समजले जात नाही. म्हणजे दलित साहित्य हे त्याच्या निर्मात्यावरून निश्चित होत नाही, तर त्यांच्या अनुभवावरून, त्याच्या अनुभवांच्या निराळेपणावरून ठरते. दलित साहित्याच्या निराळेपणा बद्दल डॉ.प्रभाकर मांडे म्हणतात की[11], "दलित साहित्याला निश्चित असे प्रयोजन आहे. ते एक हत्यार आहे, सामाजिक जाणीवा व्यक्त करणारे . . . . म्हणून दलित साहित्याचे निराळेपण हे त्यातील अनुभवांच्या निराळेपणावरून ठरते. त्याचा निर्माता दलित आहे किंवा दलितेतर आहे यावरून नव्हे." म्हणजे जन्मप्राप्त दलितत्व एवढीच दलित साहित्याची कसोटी अंतिम कसोटी नाही. या संदर्भात शरच्चंद्र

मुक्तिबोध म्हणतात,[१२] " दलित वाङ्.मय म्हणजे दलितोध्दाराचे वाङ्.मय नव्हे. मादृयांचे कथा मधील किंवा खांडेकरांच्या " दोन मने " ह्या कादंबरीचा नायकही दलितच आहे. ह्यांत लेखक वरिष्ट वर्गाचा असून तो कनिष्ठ वर्गाकडे अनुकंपेच्या दृष्टीने पाहतो. हे दलित वाङ्.मय नव्हे किंवा दलित लेखकांनी निर्माण केलेले वाङ्.मयही दलित साहित्य नव्हे. दलित असणे व दलित जाणीवा असणे हे भिन्न आहे. दलित जाणिवेतून दलित विषायक जे वाङ्.मय निर्माण होते ते दलित वाङ्.मय." या विधानात एक महत्वाचा मुद्दा मुक्तिबोध मांडतात तो " दलित जाणिवे"चा . केवळ दलित जातीतून पुढे येणारा लेखक त्यांना विचारात घ्यावासा वाटत नाही, तर त्याची जाणीव ही " दलित जाणीव" असली पाहिजे. अस्पृश्यता,दास्य,विषामता,दु:ख यांच्याशी वैर साधणारी ही जाणीव आहे. वंश, वर्ण,जाति श्रेष्ठत्वाला कसून विरोध करणारी ती जाणीव आहे -- दलित म्हणजे शोषित,श्रमजीवी असे म्हणणे फारसे योग्य ठरणार नाही. कारण ही चळवळ म्हणजे वर्गलढयाची चळवळ नव्हे. वर्ग लढयात जातिची जाणीव नसते. मला एका वर्गा विरूध्द लढावयाचे आहे ही जाणीव तेथे असते.दलित साहित्याच्या निष्ठा, त्याने स्वीकारलेला मूल्य विचार अतिशय वेगळा आहे. दलित साहित्याची चळवळ ही सांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ आहे. या चळवळीला वर्ण व्यवस्था नाकारावयाची आहे व " मनुष्यत्वाची प्रतिष्ठा " या मूल्याची स्थापना करावयाची आहे. लेखक कोणत्या जाणिवेतून लिहीतो, कोणत्या वाङ्.मयीन निष्ठा स्वीकारतो त्यावर त्या वाङ्.मयाचे स्वरूप अवलंबून असते.

दलित जाणिवेतून दलित जीवनविषायक जे वाङ्.मय निर्माण होते ते दलित वाङ्.मय या म्हणण्याचे आता विश्लेषाण करावयाचे झाले तर, बौध्द, अबौध्द, महार,चांभार,पूर्वास्पृश्य,भटक्या जमाती, आदिवासी,गुन्हेगार जमाती इ.विविध समूह म्हणजे सामाजिक अन्याय, अज्ञान, दारिद्र्य इत्यादींनी ग्रस्त असा दलित वर्ग. या वर्गाला रानटी, दुष्ट परंपरा,अंधश्रध्दा,दैववाद,भोळेपणा, गुलामगिरी या विरूध्द बंडाळा,लढयाला उद्युक्त करणारी जाणीव ती दलित

जाणीव ! या जाणिवेतून दलित जीवनाचे भेदक दर्शन घडविणारे साहित्य ते दलित साहित्य !

दलितेतरांनी केलेले दलितां विषयींचे लेखन .

दलित लेखक स्वत:च्या जाणीवा स्वत:ला अनुरूप वाटणाऱ्या साहित्य रूपांतून व्यक्त करतो आहे. दलितांचा अनुभव इतरांना येऊ शकत नाही या म्हणण्याचा अर्थ एवढाच की, जो जगतो तो लेखक आणि विशिष्ट तऱ्हेने जगणाऱ्यांविषयी जो लिहितो तो लेखक यांच्या लेखनांत अंतर पडणारच. दलितेतर लेखक आणि दलित लेखक यांच्या अनुभव घेण्याच्या शक्तीतच फरक आहे. दलितेतरांचा अनुभव संकल्पनात्मक आहे तर दलित लेखकांचा अनुभव संवेदनात्मक आहे. दलित लेखकांचे लेखन हा एक जिवंत अनुभव आहे, उलट दलितेतर लेखकाने जे लिहिले ते तितके उत्कट नसणे, जिवंत नसणे स्वाभाविकच आहे. म्हणून दलित साहित्यात आकारास येते ते दलित लेखकाचे जग. हे जग त्याचे स्वत:चे असे आहे. आणि ते भोगलेले आहे. त्या जगातच ते वाढले आहेत.दलित लेखकांची जाणीव ही अन्य वर्गीय लेखकांच्या जाणिवे पेक्षा भिन्न स्वरूपाची आहे. जीवनाचे आकलन,त्यातून गवसलेला जीवनाचा अर्थ आणि जीवनातील सामाजिक व आर्थिक विषमतेतून उदयास आलेले दु:ख दलित लेखकांच्या वाट्यांस आले आहे. ते अन्य लेखकांपेक्षा निश्चितच निराळे आहे. साध्या मानव पातळीवर दलित जगू शकत नाही. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा त्याला वर्णव्यवस्थेमुळे,जातिव्यवस्थेमुळे आर्थिक विषमतेचा बळी झाल्याने पुऱ्या करता येत नाहीत. उलट समाजाचा दास म्हणून जनावरापलीकडचे जीवन त्याला जगावे लागते. अशा वर्गातून येणाऱ्या लेखकाला जो अनुभव येतो तो दाहक, वेदनामय आहे. या दाहक, वेदनामय अनुभवाशी अन्यवर्गीय लेखकांच्या अनुभवांची तुलना होणे केवळ अशक्य आहे. आणि तशी तुलना काही समीक्षक करतात आणि या दलित जाणिवांना " मर्यादित दलित जाणीव"," ठोकळेबाज जाणीव" असे हिणवत असतात. पण असे हिणवले तरी

दलित साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव हा एक मूल्यवान आहे. हे सत्य त्यांना दृष्टी आड करता येणार नाही.

दलित समाजातील नसलेल्या ( दलितेतर ) अनेक साहित्यिकांनी दलित जीवनावर केलेल्या लेखनाला दलित साहित्य म्हणावयाचे काय ? हा एक वादाचा प्रश्न आहे. अनेक साहित्यिक व समीक्षकांनी या प्रश्नांच्या दोन्ही बाजू आपआपल्यापरीने ठाम मांडल्या आहेत. प्रा. वा.ल.कुलकर्णी, प्रा.शरच्चंद्र मुक्तिबोध, कै.वि.द.घाटे, कवी अनिल, श्री.भालचंद्र नेमाडे इत्यादींनी " पांढरपेशा वर्गातील लेखक दलित साहित्य लिहू शकेल व ते दलित साहित्य म्हणूनच मानण्यास हरकत नाही "," दलित जाणिवेतून दलित विषयक जे वाङ्मय निर्माण होईल ते दलित वाङ्मय " अशी आपली मते नोंदली आहेत आणि या सर्वांचा सूर हाच आहे की, दलित वाङ्मय लिहिण्याची विशिष्ट वर्गाची मक्तेदारी नसून ती सर्वांची आहे. ज्यांना जाणीवा आहेत,ज्यांना दलित दु:ख - समस्या समजली आहे, त्या कुणालाही दलिताबद्दल लिहिण्याचा हक्क आहे. श्री सरस्वतीच्या दरबारात कुणालाही मनाई नाही.[१३]

दलितांनी दलितां विषयी पण केवळ दलितांसाठी नव्हे - तर सर्वांसाठी असलेले साहित्य हे दलित साहित्य अशी घोषणा केली जात असतांना "दलित" शब्द जातिवाचक आहे काय ? असा सवाल कवी अनिलांनी विचारला आणि म्हटले की,[१४] "दलितांच्या जीवनाची संवेदनापूर्व जाणीव ठेवून लिहिलेले साहित्य असले तर त्याला दलित साहित्य कां म्हणू नये ? " अनिलांच्या या प्रश्नाचे उत्तर शंकरराव खरात यांनी दिले आहे[१५] त्याचे सार असे की,लेखकाचा जीवनानुभव त्याच्या साहित्याच्या मुळाशी असतो. लेखक आपल्या अनुभवांशी प्रामाणिक राहून साहित्याला जन्म देत असतो. तेच साहित्य उत्कट,जिवंत बनते. दलित साहित्यिक आपण जे भोगले,अनुभवले,त्याच्याशी इमान राखून साहित्य निर्माण करीत असल्याने ते साहित्य उत्कट, जिवंत बनते. रसरशीत,सखोल बनते. पण दलितेतर साहित्यिकांनी जे दलितांचे दु:ख भोगलेले नाही, जे अनुभवलेले नाही

त्याच्या आधारे साहित्य निर्माण करावयाचे म्हटले तर त्यांच्या दुय्यम प्रतीच्या अनुभवातून निर्माण झालेले वाङ्मय अस्सल, उत्कट दलित वाङ्मय नव्हे. आणि म्हणून दलित साहित्यिक त्यांच्या जीवनातील सच्च्या अनुभवातून जिवंत साहित्याला जन्म देतो, म्हणून ते अस्सल दलित साहित्य होते. पण दलितेतर - साहित्यिकाने आपल्या दुय्यम प्रतीच्या अनुभवातून कल्पना शक्तीच्या जोरावर निर्माण केलेले वाङ्मय " दलित साहित्य " होऊ शकेल पण ते दुय्यम दर्जाचे " दलित साहित्य " होईल. शंकरराव खरातांचे हे मत लक्षणीय आहे. या पार्श्वभूमिवर महाबळेश्वर येथील दलित साहित्य संमेलनात परिसंवादात " दलितांची दु:खे दलितांनाच समजतील हे विधान मर्यादित अर्थाने खरे आहे " हे प्रा. विद्याधर पुंडलिकांचे मत[१६] आपोआपच निकालात निघते.

दलित साहित्याचे स्वरूप

दलित कोण ? या प्रश्नाची उत्तरे निरनिराळ्यारीतीने देणाऱ्या विचारधारा आहेत पण दलित साहित्य म्हणजे विद्रोहाचा जाणिवपूर्वक उद्घोष करणारे साहित्य असा विचार सर्वांनी वारंवार मांडला आहे. मराठी साहित्यातील दिलीप चित्रे वगैरे साहित्यिक बंडाची जी भाषा बोलतात तीत व दलित लेखकांच्या बंडाच्या जाणिवांत फरक आहे. हे डॉ.म.ना.वानखेडे[१७] यांनी स्पष्ट केलेले आहे. आणि हे सत्यच आहे की, दलित लेखकांची बंडखोरी, त्यानी व्यक्त केलेला विद्रोह अन्यायाविरूध्द आहे. सवर्णांनी केलेल्या छळाविरूध्द आहे. पण या " विद्रोहा"चे नीट आकलन न झाल्यानेच डॉ.भीमराव कुलकर्णी दलित साहित्यातील या चीडीला व संतापाला " खोटा व उरबडवा" असे म्हणताना दिसतात.[१८] तर प्रा. विद्याधर पुंडलिक या विद्रोही दलित साहित्याबद्दल बोलताना म्हणतात[१९] " जे साहित्य चिडीवर आधारित असते ते अल्पजीवी असते " -- पण हा केवळ एका उपेक्षित जमातीचा प्रक्षोभ नव्हे आणि तो आला तसा एक दिवस अचानक संपेल अशा भ्रमात कुणी राहू नये. कोणतीही जाणीव मग ती चिडीची असो,

संतापाची असो, ती खरीखुरी असेल तर ती झपाटून टाकते. अल्पजीवी ठरते ते चिडीचे वा संतापाचे प्रदर्शन ! दलित लेखकांनी जे भोगले आहे त्याचे त्यांना दर्शन घडवायचे आहे, प्रदर्शन नव्हे.

(प्रतिगामी वृत्ती,अन्याय व द्वेष ज्या देशात वाढत असतो तेथे विद्रोहाचा जन्म होतो. दलित वर्गाला या देशातील प्रतिगामी वृत्तींनी जीवन नकोसे केले आहे. अन्याय आणि अत्याचार यांच्याशिवाय दलितांच्या वाट्याला काही आलेले नाही.) दलितेतरांनी त्यांना प्रेमाने वागविलेले नाही. त्यांना माणूस म्हणून जगू दिले नाही. /सामाजिक, अन्याय,जुलूम, भेदाभेद आणि आर्थिक शोषण यांचा अनुभव या वर्गाला आलेला आहे. आणि म्हणून या दलितांनी जाणून बुजून विद्रोहाची भूमिका घेतली आहे.) अन्याय, छळ,वेदना - सोसणाऱ्या या दलित वर्गातून " विद्रोहा"च्या ठिणग्या पेटल्या. (सम्यक परिवर्तन या साहित्याला अभिप्रेत असल्यामुळे दलित साहित्य सर्वकष क्रांतीचा पुरस्कार करू लागले आहे.) कोणत्याही लेखकाच्या मनात विद्रोहाची भावना उद्यास येईल, पण दलित लेखकाचा विद्रोह निराळा. (आपण माणूस आहोत आणि माणसाचे सारे हक्क आपल्याला मिळायला हवेत या जाणिवेतून हा विद्रोह जन्माला आलेला आहे. ज्यांना माणसासारखे मानाने जगणे कठीण झाले आहे त्यांच्या साहित्यात विद्रोहाशिवाय दुसरे काय असणार ? बाबुराव बागूल सांगतात[२०] त्या प्रमाणे अस्पृश्यता घालवावयाची असेल तर केवळ समाज बदलून जमणार नाही तर राजकीय,आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक परिवर्तन आवश्यक आहे. अशा सम्यक " क्रांती " साठी दलित साहित्य विद्रोहाची भूमिका घेते. डॉ. भालचंद्र फडके सांगतात की :[२१] " माणसाच्या शत्रूंशी, माणसाला कमी लेखणाऱ्या व्यवस्थेविरुध्द हा विद्रोह आहे. मानवते विषयीच्या करूणेच्या पोटी, जीवनावरील प्रेमापोटी हा विद्रोह जन्मलेला आहे." आणि खरोखरच या दलित साहित्यिकांना अभिप्रेत आहे तो नवा माणूस !) म्हणून जग बदलून टाकायचे असेल तर माणसाची प्रकृती,वर्तन बदलले पाहिजे.नवा माणूस

निर्माण झाला पाहिजे. आणि नवा माणूस निर्मिण्यासाठी सम्यक् क्रांतीची जरूरी आहे. या सम्यक क्रांतीसाठी हा विद्रोह अवतरला आहे.

विद्रोही दलित-साहित्याने समाजपरिवर्तन हे प्रयोजन मानले आहे. " माणूस हाच साहित्याचा केंद्रबिंदू म्हणून दलित लेखकाला वाटते की, माणसाला माणूस म्हणून म्हणून जगता आले पाहिजे. त्याच्यातल्या महानतेच्या विकासाला सर्व दिशा मोकळ्या झाल्या पाहिजेत. त्यासाठी दलित लेखकाला विद्रोहाच्या वाटेने जावे लागते.

दलित लेखकांचा विद्रोह विशिष्ट व्यक्तीविरूद्द वा विशिष्ट जमातीविरूद्द नाही तर हा विद्रोह, ही बंडखोरी स्वत्व शोधासाठी आहे. प्रतिगामी प्रवृत्ती विरूद्द हा विद्रोह आहे. दलित साहित्यातून व्यक्त होणारा विद्रोह वर्णव्यवस्थेविरुद्द आहे. ही वर्ण व्यवस्था मानणाऱ्या धर्माविरूद्द आहे. माणुसकीचे हक्क नाकारणाऱ्या समाजा - विरूद्द, अत्याचाराविरूद्द आहे. विद्रोह हेच दलित साहित्याचे प्रकृति - वैशिष्ट्य आहे असे प्रतिपादन करणारे डॉ. म.ना.वानखेडे म्हणतात,[२२] " दलित साहित्य म्हणजे दलित लेखकांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य दलिताला समाजापासून विभक्त व्हावयाचे आहे असा त्याचा अर्थ नाही. समाजात राहूनच त्याला हे करावयाचे आहे फरक एवढाच की दयेच्या याचने ऐवजी हा लेखक आग ओकू पाहतो आहे. तीक्ष्ण हत्यार बरेचदा प्राण वाचवते. सडलेल्या भागाला कापून काढून पुन: माणूस बनवते. ही फुटीर वृत्ती नाही ही असत्यावर, ढोंगावर,अन्यायावर, चिडीने आसूड मारणारी समाजाला जोडणारी वृत्ती आहे " --विद्रोहाच्या प्रक्रियेत जिवंत लेखक असतो. त्या विद्रोहाच्या चक्राचे परिवर्तन निष्क्रीय लेखक करू शकणार नाही. तर क्रियाशील लेखकच ते करू शकेल, या अर्थाने हे दलित साहित्यिक ' क्रियाशील ' साहित्यिक आहेत. ते अस्पृश्यता नाकारत

आहेत. जो नाकारतो तो त्याच वेळी स्वीकारत असतो. दलित लेखकाने " मनुष्यत्वाची प्रतिष्ठा " स्वीकारली आहे. हे एक महान मूल्य आहे. एक मूल्यसमूह नाकारून नवा मूल्यसमूह अस्तित्वात यावा म्हणून विद्रोहाचा अवतार असतो, म्हणून मूल्यभाव नसेल तर विद्रोहाला काहीही अर्थ नाही. मूल्यभाव व विद्रोह यांचा घनिष्ठ संबंधआहे. आणि ही गोष्ट दलित साहित्यिक विसरलेले नाहीत.)

दलित साहित्याची भूमिका सांगताना या विद्रोहाला सामाजिक परिवर्तनाची आस आहे. नव्या जीवनाची, मानवतेची स्वप्ने पाहण्यासाठी हा विद्रोह आहे. केवळ बंडा करता हे बंड नाही, तो पलायनवाद नाही हे आवर्जून मांडावे लागते कारण जीवनातील अंधार, दाहकता मांडता मांडता ही दलित कविता एकीकडे उद्याच्या जीवनातील सुंदर स्वप्नेही पाहते, म्हणून तिला काही समीक्षक पलायनवादी ठरवतात. (विद्रोही साहित्या मागची दुहेरी कार्यप्रणाली लक्षात घेण्यास प्रा. रा.ग. जाधव यांनी व्यक्त केलेले विचार महत्वाचे आहेत[२३]. ते म्हणतात, " विद्रोही साहित्यातील शब्दांना एकाच वेळी दोन संदर्भ असतात. आणि या दोन संदर्भाच्या ताणामधून त्याचा आशय रूपास आलेला असतो. आत्माविष्कार आणि समाज परिवर्तन अशा दोन उद्दिष्टांनी व्यक्त झालेल्या या दलित साहित्याच्या विद्रोहामध्ये मराठी संस्कृतीला उन्नत करण्याची शक्ती आहे. )

आजच्या दलित कवितेतून तिने जे दु:खाचे वास्तव प्रकट केलेले आहे, ते प्रकट करताना आतापर्यन्त मराठी कवितेला अपूर्व व अननुभूत अशा धगधगत्या अनुभवांचा साठा तिने मोकळा केलेला आहे. ती कविता एकसुरी, ठोबळ म्हणता येणार नाही. दलितांची कविता ही तरुण व जागत्या संवेदनाशील मनाची रसरसती कविता आहे. या कवितेमध्ये थोडासा एकसुरीपणा जरी जाणवला तो अपरिहार्य आहे.

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

दलित साहित्यामध्ये येणारा प्रक्षोभ हा अपरिहार्य आहे. जुनी अन्यायकारक समाजरचना मोडल्याशिवाय व्यक्तिगत जीवन विकासाला वळण लागणार नाही असा त्यांचा दृढ विश्वास आहे. सर्वंकष परिवर्तनाची इच्छा करीत असलेले दलित वाङ्मय हे एकसुरी आक्रोश करते असे म्हणणे बरोबर होणार नाही. येथील दलितांना प्रथम ' माणूस ' म्हणून जगण्याचेही हक्क मिळवावयाचे होते. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक मुक्ती मिळविणे हे तर दलितांच्या दृष्टीने कित्येक योजने दूर होते असे दिसेल. ' दलित साहित्य, आज चर्चा ' मध्ये प्रा. मे.पु. रेगे म्हणतात[१४] " जर भारतीय समाजाची पुनर्घटना व्हावयाची असेल तर हा कालखंड विद्रोहाचा राहिला पाहिजे " हे म्हणणे लक्षणीय आहे. तेव्हा सतत संतप्तता आणि शाप यांचा वर्षाव करीत राहिल्यामुळे कविता एकसुरी होईल असे कुणी म्हटले तर समजू शकते पण कवितेतून व्यक्त होणाऱ्या दलितांच्या प्रक्षोभाला " फॅशनेबल प्रक्षोभ " असे संबोधून या कवितेची कुचेष्टा करीत राहणे कितपत न्याय आहे ?

दलित कवितेला अन्यायाविरुद्ध, अत्याचारा विरुद्ध, छळा विरुद्ध सतत आवाज उठवावा लागतो. म्हणून पांढरपेशा मध्यम वर्गीय कवींना अन्यायाची, अत्याचाराची,छळाची झळ पोहचलेली नाही, त्यांना दलित कवींनी आक्रोश थांबवावा, आवरावा असे म्हणण्याचा कांही अधिकार आहे काय ? --- दलितांची जन्मव्याकुळ कविता ज्वालामुखी सारखी उफाळून येणार. आपल्या शब्दाशब्दातून उत्थानांची वादळे घोंघावत ठेवणारच. चिडलेल्या, दडपलेल्या,नाकारलेल्या समाजाचे दुःख सांगत, संताप व्यक्त करीत शिवाय शिव्याशाप देत, आग ओकत दलित कविता जन्माला आली. तेव्हा या कवितेला आक्रस्ताळी, उरबडवी अशी विशेषणे लावून हिणावणे योग्य नाही.

गो.मं. कुलकर्णी म्हणतात [२५] त्या प्रमाणे विद्रोही कविता साहित्य कला दृष्टया प्रभावी आहे. कारण तिच्या नसानसातून खेळणारे रसायन सुसंगत जीवनाचे गाणे गाते. म्हणून ती निव्वळ उद्रेकरूप एवढीच उरत नाही. विश्वाच्या कोनाकोपऱ्यात विखुरलेल्या, आजपर्यन्त प्रकट न झालेल्यांचा आवाज, तिच्यातून उमटतो. अभिव्यक्तीचे अनेक रंग तिच्यात आहेत.

दलित कवितेत व्यक्त झालेली जाणीव ही प्राधान्याने स्वर्णा-विरुध्द बंड करणारी आहे की प्राधान्याने माणूसपणाचा हक्क मागणारी आहे असा प्रश्न निर्माण होतो. ती कविता माणसासाठी आहे. स्वर्णा-विरुध्दचा चीड, संताप, विद्रोह हा साहित्यात जरूर आहे परंतु या सामाजिक विकृतीवर नेमकेपणाने बोट ठेवता ठेवता हा रोग दलित लेखकाला दूर करावयाचा आहे. हे करीत असतांना कलावंताची भूमिकाही तो पूर्णपणे टाळू शकलेला नाही. हे लक्षात घेतले पाहिजे.

निग्रो लेखक रिचर्ड राईट याने साहित्याकडे ते क्रांतीचे साधन म्हणून पाहिलेले आहे. निग्रो लोकांची अगतिकता, दुबळी, लाचार प्रतिमा बाजूला करून त्याला ती उज्ज्वल क्रांतिकारक प्रतिमा करावयाची आहे --- दलित साहित्यात अवतरलेली दलित कविता ही सामाजिक क्रांतीचे साधन म्हणून प्रकटली आहे. ती उत्कट, प्रभावी आहे. साहित्य हे क्रांतीचे साहित्य आहे असे मानता मानता शेवटी ती एक कला आहे. आणि कलेचे क्षेत्र विविध प्रकारच्या तटबंधा मोडून काढणारे असते. दलित साहित्यातून प्रकटणाऱ्या विद्रोहाची आकृती आणि प्रकृती लक्षात घेऊनच नंतर त्याच्यावर आक्षेप घेतले जावेत, एरवी नाही.

दलित साहित्याची भूमिका सांगताना विद्रोहाच्या जोडीला नकार

हे तत्व सांगितले जाते. आज दलित साहित्य काही नाकारात आहे. कारण त्याने काही अमोल असे स्वीकारले आहे. माणूस हा सर्वश्रेष्ठ आहे, त्याची प्रतिष्ठा हे सर्वोच्च मूल्य आहे हे दलित साहित्याने स्वीकारले आहे. इतिहासाने आपल्यासाठी अंधार दिला म्हणूनच आमच्या साहित्यात नाकारण्याची भाषा आली असा त्यांचा दावा आहे. आणि खरोखरच या समाजाने दलितांना फक्त अंधार- आणि अंधारच दिला आहे. समाजाने त्याना अशा ब-याच गोष्टी दिल्या आहेत की ज्या नाकारल्या शिवाय हे दलित माणूस म्हणून जगू शकणार नाहीत.

दलित वाङ्मय हे परंपरेविरूध्द आहे. दलित साहित्याला प्रस्थापित परंपरा, रूढी, चालीरीती मान्य नाहीत. जुन्या रूढी-परंपराचा ते धिक्कार करते. दलित साहित्याला हिंदुधर्म ग्रंथातील परंपरावाद, चातुर्वर्ण्य, जाति - व्यवस्था व अस्पृश्यता मान्य नाही. त्या विरूध्द दलित साहित्य विद्रोही भूमिका घेते. त्यांच्या विरूध्द बंड करून उठते. ते " मनुस्मृती " मानत नाही तर " भीम - स्मृती " मानते. धर्मग्रंथ, श्रुति, स्मृती आणि त्यातून निर्माण झालेल्या युगायुगाच्या परंपरा यांच्या विरूध्द दलित साहित्यिकांचा विद्रोह आहे. आणि म्हणूनच परंपरा, श्रुतिस्मृतीची शिकवणूक आपल्या ओव्या अभंगातून जपणा-या संत परंपरेला ते नाकारते. त्यांच्या परंपरागत शिकवणुकीचा धिक्कार करते. त्या संत वाङ्मयाला कडवा विरोध करते.

मराठी साहित्यात गेल्या सात-आठशे वर्षात विपुल निर्मिती झाली आणि होत आहे. पण या सर्वांत उपेक्षित समाजाच्या जगण्या - मरण्याची साहित्यात कुणीही दखल घेतली नाही. मराठी संत, पंडित, शाहीर आणि त्यांच्या नंतर आजपर्यन्तचे कवी लक्षात घेतले तर अस्पृश्यांच्या दुःखाला या साहित्याला स्थान मिळाले नाही. सारे साहित्य

विशिष्ट वर्गीयासाठी निर्माण झाले आहे. एखादेच केशवसुत, एखादेच माटे उपेक्षितांच्या अंतरंगाचे दर्शन घडवितात. यांच्या व्यतिरिक्त मराठीत व्यक्त झालेले जीवनानुभव केवळ एकाच वर्गाचे आहेत. मराठी साहित्यात एका तुच्छ कोपऱ्यातही दलित वर्गाला स्थान नव्हते. मराठी साहित्याने त्याची दखल घेतली नव्हती. दलितांचा, पीडितांचा व शोषितांचा एक मोठा समूह अदम्य वेदनेने चित्कारत असताना त्यांच्या वेदनेचा पडसाद आमच्या वास्तववादी समजल्या जाणाऱ्या वाङ्मयात उमटला नव्हता. मराठी साहित्याने दलितांच्या व्यथांची कधी दखलच घेतली नाही. म्हणून दलित साहित्याचे एक प्रमुख समर्थक डॉ. म.ना.वानखेडे असे विचारतात की, " दलितांनी वाचावे, आपले मानावे असे आहे तरी काय त्या वाङ्मयात ? " मराठी साहित्य म्हणजे दलितांच्या दृष्टीने मृगजळच आहे. आणि म्हणून दलित साहित्य ही मराठी साहित्याची परंपरा नाकारते. हे मराठी वाङ्मय त्यांना नाकारावेसे वाटते. बाबुराव बागूलांनी अगदी ठामपणे मराठी साहित्याची परंपरा ही आमची परंपरा नव्हे असे म्हटले आहे.[२६]

मराठी साहित्य हे मुख्यत: ब्राह्मणी साहित्य असून त्यावर वर्णव्यवस्थेचा प्रभाव आहे. त्यामुळे सामाजिक मंथनाचे,परिस्फोटाचे, स्फोटक समस्यांचे आकलन त्यात होत नाही,दलितांना ते साहित्य आपले वाटत नाही असे आपले म्हणणे दा.ता.रूपवते यांनी नोंदले आहे.[२७]

अशाप्रकारे दलित साहित्याने लौकिक परंपरा व रूढी जशा नाकारलेल्या आहेत त्याच प्रमाणे मराठी साहित्य परंपराही नाकारल्या असून दलितांनी आपल्या स्वत:च्या मालकीचे साहित्य निर्माण केले आहे.

डॉ.भालचंद्र फडके यांनी दलित साहित्यिक कोणकोणत्या गोष्टी नाकारणार आहे हे सांगताना म्हटले आहे,[२८] " तो नाकारणार आहे जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था. तो नाकारणार आहे त्याला बांधून ठेवणारी अस्पृश्यता. तो नाकारणार आहे धर्मसत्ता, धनिकसत्ता, गुलामीत

अडकवणारी हितसंबंधीयांची सत्ता. तो नाकारणार आहे माणसाला नष्ट करणाऱ्या हिंस्र प्रवृत्ती. तो नाकारणार आहे माणसाला पंगू करणाऱ्या अंधश्रध्दा, तो नाकारणार आहे पारंपरिक तटबंदी आणि जुन्या जळमटलेल्या विद्या, तो नाकारणार आहे अत्याचार, दडपशाही,
१ वशिलेबाजी आणि स्वार्थी संधीसाधुपणा. तो नाकारणार आहे मराठी वाङ्मयातील बुरसट परंपरा. तो नाकारणार आहे हिंदुधर्मातील पुराणकथा ( Myth ) आणि कोता कर्मठपणा. तो नाकारणार आहे सरंजामशाही आणि पुरोहितशाही." दलितांच्या नकाराचे हे सर्वकष स्वरूप पाहिले की, दलितांच्या अंथांग दुःखाची आणि असंतोषाची कल्पना येते. कारण हा नकार असंतोषापोटीच दिला गेला आहे.

दलित साहित्यिकांच्या या नकारामागची भूमिका काय असावी असा प्रश्न मनांत उभा राहातो. या नकारामागची भूमिका स्पष्ट करणारे प्रा. केशव मेश्राम यांचे विधान खूप बोलके आहे.[११] " भोवताल व परिस्थिती यांच्या जाणिवांनी दलित समाज पूर्ण ढळला आणि ह्या ढळलेपणाच्या जाणिवेने तो साऱ्या घटितांचे व घटकांचे नवे आकलन करू लागला. जे माझ्यावर लादले आहे, हे ओझे आहे. यातली चिंधीही आपली नाही. हे झुगारले, नाकारले, फेकले पाहिजे. या नव्या आकलनातून एका प्रखर नकाराचा जन्म होतो." दलित साहित्याचा भर आहे तो नव्या मूल्याधिष्ठित समाज रचनेवर. त्यासाठी तो अज्ञान, दारिद्र्य, पिळवणूक नाकारीत जाईल आणि एक बंदिस्त समाज निर्माण न करता खुला समाज निर्माण करील. या साहित्याला एक सांस्कृतिक परिवर्तन अपेक्षित आहे.

(कोणत्याही नकाराच्या भूमिकेला जर स्वीकाराची दृष्टी असेल तरच तो नकार अर्थपूर्ण होतो. अन्यथा केवळ नाकारत जाण्यात काहीच अर्थ राहात नाही. वर्णव्यवस्थेत, जातिव्यवस्थेत माणसाचे अवमूल्यन होते. म्हणून दलित साहित्याने वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था नाकारली तर या

साहित्याला " माणूस महान आहे " हे सूत्र स्वीकारलेच पाहिजे.)

या नकारात्मक भूमिकेने दलित साहित्याला, विशेषत: दलित कवितेला एक तीव्र धार प्राप्त करून दिली आहे. जागृत दलित मनाच्या असह्य दु:खातून निर्माण झालेल्या आणि दु:खकारणांना दिल्या गेलेल्या या नकाराने दलित साहित्याला तेजस्विता प्राप्त करून दिली आहे. दलित कवितेत आवेशयुक्त वक्तृत्वपूर्णता निर्माण केली आहे. दलित कवितेतून प्रकट होणाऱ्या जीवननिष्ठेचा हा नकार म्हणजे एक अविभाज्य भागच आहे.

दलित साहित्यिकांच्या नकाराधिष्ठित भूमिकेसंबंधी बाळकृष्ण कवठेकर लिहितात की,[३०] " नकार देण्याच्या या साऱ्या प्रकारातील विनोद हा की पांढरपेशाच्या संस्कृतीचा आणि साहित्याचा निषेध करणारे, त्याला नकार देणारे बहुसंख्य दलित साहित्यिक शहरी आहेत. पांढरपेशा-सारखे जीवन जगणारे आणि वृत्तीने जवळपास पांढरपेशेच झालेले असे आहेत. त्यांनी संस्कृती आणि साहित्य यांना पांढरपेशाचे म्हणून नकार देणे ही गोष्ट विनोदी व उपेक्षणीय मानली पाहिजे " कवठेकरांच्या या मतात कांही अंशानी तथ्य असले तरी कालखंडाच्या बदलामुळे यांत्रिकीकरणामुळे शहरात माणसात बाह्य बदल झाला, पण माणसाच्या अंत:करणात बदल झाला नाही. दलित लेखक वर दिसायला पांढरपेशी दिसत असला तरी त्याची मुळे गावच्या मातीतच खोलवर रुजलेली आहेत. आणि गावची माती अजून बदललेली नाही. ही गोष्ट मात्र त्यांनी जाणून घेतलेली दिसत नाही.

( नकाराने निर्माण केलेल्या दलित साहित्याच्या स्थिरकेन्द्रीपणामुळे अत्यंत अल्पकाळातच दलित साहित्य गतिरुध्द होईल अशी चिंता व्यक्त केली जात आहे, ती निराधार आहे कारण कालच्या जीवनाला नकार देत असतानाही आजचे दलित साहित्य उद्याच्या सूर्योदयाची स्वप्ने पाहात आहे. आज दलित साहित्य काही नाकारीत आहे, कारण त्याने कांही अमोल

असे स्वीकारले आहे. माणूस सर्व श्रेष्ठ आहे, त्याची प्रतिष्ठा सर्वोच्च मूल्य आहे हे दलित साहित्याने स्वीकारले आहे. दलित साहित्याचे मानवता हे तत्व आहे. दलित साहित्य नकार आणि विद्रोह यांच्याकडून मानवतेकडे वाटचाल करते आहे. माणसाने माणूस म्हणून जगणे आणि जगू देणे म्हणजे मानवतावाद. दलित साहित्याने ही भूमिका समजून उमजून स्वीकारली आहे म्हणून ते नुसत्या दलितांचे नव्हे तर समग्र मानवतेचे साहित्य बनले आहे. दलित साहित्याने वर्णव्यवस्था नाकारली असली तरी या साहित्याने " माणूस महान आहे " हे सूत्र स्वीकारले आहे. दलित साहित्य माणसाला केंद्रबिंदू मानते. आज माणसाचे अंतर्विश्व व बाह्यविश्व उद्ध्वस्त होत आहे. म्हणून त्याच्या मनात आपण अगतिक आहोत, आपण असहाय आहोत, एकाकी आहोत अशी एक भावना रुजत आहे. या वैफल्यातून माणसाला बाहेर काढण्यासाठी दलित साहित्य धडपडते आहे. कालच्या आणि आजच्या अंशात "मी" साठी दलित साहित्य " माणसाचे गाणे " गाते आहे. " माणूसकीचे " मोल स्पष्ट करते आहे. श्री प्र. श्री. नेरूरकर म्हणतात,[२१] "दलित साहित्याची चळवळही एक ठाम, सक्रिय व सर्जनात्मक नकारवादातून निर्माण झाली आहे." दलित साहित्याची बांधिलकी मनुष्याची - मनुष्यत्वाची प्रतिष्ठा मानणाऱ्या तत्वप्रणालीशी आहे. दलित साहित्यिकांना फक्त अस्पृश्यांची मुक्ती हवी आहे असा जो आक्षेप घेतला जातो तो चुकीचा आहे. त्यांना मुक्ती हवी आहे ती मानवाचे अवमूल्यन करणाऱ्या अस्पृश्यतेपासून आणि त्या अस्पृश्यतेला जन्म देणाऱ्या वर्णव्यवस्थेपासून. समाजाचे सर्व थर आर्थिक दृष्ट्या एका पातळीत असले तरी ते सामाजिक दृष्ट्याही समपातळीत हवेतच. आर्थिक प्रश्नापेक्षा माणूस म्हणून जगण्याचे मूलभूत अधिकार देणार की नाही हा प्रश्न आम्हाला महत्वाचा वाटतो असे दया पवार म्हणतात. दलित साहित्याची बांधिलकी विशिष्ट व्यक्तीशी नाही तर माणसाला श्रेष्ठ मानणाऱ्या विचाराशी आहे.

दलित साहित्य हे त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झालेले आहे. माणुसकीच्या मुक्तीचा, दास्य-मुक्तीचा ते आवाज उठवत आहे. दलितांच्या तळागाळातील जीवनातील दुःखाच्या मुक्तीबरोबर आशा आकांक्षाही दलित साहित्यात दिसतात. दलित साहित्यात जीवनाचा प्रवाह दुथडी भरून वाहात आहे. दलित साहित्य आपल्या अस्मितेचा शोध घेत आहे. ते आपल्या आत्मतेजाने पुढे येत असून स्वयंप्रकाशित बनत आहे. दलित साहित्य दलितांच्या दास्यमय जीवनातील दुःखाच्या वेदना सांगत आहे. आणि दुःखी जीवनातील वेदनांनी चिडून संतप्त होऊन हिंदु-धर्मा विरुध्द, प्रथा विरुध्द, परंपरेविरुध्द, दास्य गुलामगिरी विरुध्द, अस्पृश्यतेविरुध्द, उच्चनीच जातिव्यवस्थेविरुध्द आपला आवाज - विद्रोही आवाज उठवीत आहे. दलित साहित्य हे आशावादी साहित्य आहे. समतेचा नवसमाज निर्माण करण्याची त्याची आकांक्षा आहे. दलित साहित्यात अशी वेगळी अंतर्मनातील सामाजिक जाणीव, वेगळा माणुसकीचा आशय डॉ. आंबेडकरी प्रेरणांनी भरलेला आहे. म्हणूनच दलित साहित्य आपल्या वेगळ्याच जीवनानुभवाचे, वेगळ्याच शैलीत, वेगळ्या भाषेत प्रत्ययकारी दर्शन घडवत आहे.

## संदर्भ ,टीपा इ.


| | | |
|---|---|---|
| १. फडकुले निर्मलकुमार | - | साहित्यवेध, व्हीनस प्रकाशन,पुणे एप्रिल १९७८, पृष्ठ ९९. |
| २.मेश्राम केशव | - | दलित लेखकांचे पहिले संमेलन,महाबळेश्वर मधील ठराव क्र.५, प्रबुध्दभारत, मार्च १९५८. |
| ३. बागूल बाबुराव | - | अस्मितादर्श, मे-जून १९७७,पृष्ठ ४१. |
| ४. वानखेडे म.ना. | - | दलित साहित्य संमेलन,नागपूर १९७६ येथील अध्यक्षीय भाषण. |
| ५. कऱ्हाडे सदा | - | दलित साहित्याच्या निमित्ताने, सत्यकथा, जुलै १९७०. |
| ६. मांडे प्रभाकर | - | दलित साहित्याचे निराळेपण,धारा प्रकाशन औरंगाबाद,मार्च १९७९,पृष्ठ २५. |
| ७. मेश्राम केशव | - | महाराष्ट्र टाईम्स,१४ नोव्हेंबर,१९७०. |
| ८. फडके भालचंद्र | - | दलित साहित्य : वेदना व विद्रोह, श्रीविद्याप्रकाशन,पुणे, डिसेंबर १९७७, पृष्ठ २९. |
| ९. ढाले राजा | - | "नाकेबंदी" काव्यसंग्रहाची प्रस्तावनेतून, "मी आणि माझे लेखन " अस्मितादर्श दिवाळी अंक १९७६, |

| | | |
|---|---|---|
| १०. ढाले राजा | - | "मी आणि माझे लेखन " अस्मितादर्श दिवाळी अंक १९७६. |
| ११. मांडे प्रभाकर | - | दलित साहित्याचे निराळेपण, धारा प्रकाशन, औरंगाबाद, मार्च १९७९, पृष्ठ ३१. |
| १२. मुक्तिबोध शरच्चंद्र | - | दलित साहित्य, सिंहगर्जना, जाने., १९७६. |
| १३. घाटे वि.द. | - | दलित साहित्य संमेलन, महाबळेश्वर येथील परिसंवाद, महाराष्ट्र टाईम्स, १४ नोव्हें., १९७०. |
| १४. कवी अनिल | - | दलित साहित्य संमेलन, महाबळेश्वर येथील परिसंवाद, महाराष्ट्र टाईम्स, १४ नोव्हें., १९७०. |
| १५. खरात शंकरराव | - | दलित वाङ्मय : प्रेरणा व प्रवृत्ती, इनामदार बन्धुप्रकाशन, पुणे, मार्च १९७८, पृष्ठ ३८. |
| १६. पुंडलिक विद्याधर | - | दलित साहित्य संमेलन, महाबळेश्वर येथील परिसंवाद, १९७०. |
| १७. वानखेडे म.ना. | - | दलित साहित्य संमेलन, नागपूर १९७६ येथील अध्यक्षीय भाषण. |
| १८. कुलकर्णी भीमराव | - | दलित साहित्य संमेलन, महाबळेश्वर येथील परिसंवाद, १९७०. |

१९. पुंडलिक विद्याधर - दलित साहित्य संमेलन, महाबळेश्वर येथील परिसंवाद, १९७०.

२०. बागूल बाबुराव - एक मुलाखत, माय-मराठी, दलित साहित्य विशेषांक, १९७५.

२१. फडके भालचंद्र - दलित साहित्य : वेदना व विद्रोह, श्री विद्या प्रकाशन, पुणे, डिसेंबर १९७७, पृष्ठ ६८.

२२. वानखेडे म.ना. - बाबुराव बागूलांच्या "सूड" दीर्घकथेच्या प्रस्तावनेतून.

२३. जाधव रा.ग. - निळी पहाट, श्री विद्या प्रकाशन, पुणे, एप्रिल १९७८.

२४. रेगे मे.पु. - दलित साहित्य : आद्यचर्चा मधून.

२५. कुलकर्णी गो.ग. - साहित्य: दलित आणि ललित, नूतन प्रकाशन, पुणे, आगस्ट १९७७, पृ.१९ ते २९.

२६. बागूल बाबुराव - बौध्द साहित्य संमेलन, महाड, अध्यक्षीय भाषण, अस्मितादर्श, अंक १, वर्ष ४.

२७. रूपक्ते दा.ता. - प्रतिष्ठान, फेब्रुवारी १९६८.

२८. फडके भालचंद्र - दलित साहित्य : वेदना व विद्रोह, श्री विद्या प्रकाशन, पुणे, डिसेंबर १९७७, पृष्ठ ७२-७३.

२९. मेश्राम केशव - दलित साहित्य : काही विचार, अस्मितादर्श, जाने-फेब्रु.-मार्च,१९७३.

३०. कवठेकर बाळकृष्ण - दलित साहित्य : एक आकलन । वाङ्मयीन चर्चा आणि चिकित्सा,नवसाहित्य प्रकाशन,बेळगांव,ऑगस्ट १९७८,पृष्ठ १६.

३१. नेरूरकर प्र.श्री. - दलित साहित्याची प्रक्रिया व कांही रूपरेखा,माय-मराठी,ऑगस्ट,१९७५.


..